GLOBAL FOUNDATION

A GLOBAL Group Initiative

# For Bright Career

Publication: Maharashtra Times | Date: Saturday, 4th June 2011


सिद्धेश कोंडविलकर

**डोळसांना शक्य होत नाही अशा अनेक गोष्टी अंध लीलया करताना दिसतात. आता आणखी एका बाबतीत अंधांनी बाजी मारली आहे. ग्लोबल फाऊण्डेशन चालवत असलेल्या श्री हरिराम जेथाभाई फूलवाधवा ॲडव्हान्स्ड कम्प्युटर सेण्टर फॉर ब्लाईंड या सेण्टरमुळे अनेक अंधांचं जीवन प्रकाशमान झालं आहे. त्याचबरोबर कम्प्युटरमध्ये पारंगत होऊन हे तरुण आर्थिकदृष्ट्या स्वावलंबीसुद्धा बनले आहेत.**

# 'प्रकाशमान' करिअरकडे

मस्जिद बंदर स्टेशनपासून अवघ्या पाच मिनिटांच्या अंतरावर श्री हरिराम जेथाभाई फूलवाधवा ॲडव्हान्स्ड कम्प्युटर सेण्टर फॉर ब्लाईंड ही संस्था आहे. इथे अंधांना कम्प्युटरचं प्रशिक्षण दिलं जातं. पण नुसतंच कम्प्युटरचं प्रशिक्षण देणं हा सेण्टरचा उद्देश नाही. तर अंध मुलांनी स्वतःच्या पायावर उभं राहावं, स्वतःचं करिअर बनवण्याची संधी त्यांना उपलब्ध करून देणं हे या त्यांचं ध्येय आहे. या सेण्टरमुळे अनेक अंध मुलांचं आयुष्य 'प्रकाशमान' झालं आहे.

साधारणतः पाच वर्षांपूर्वी या सेण्टरची स्थापना झाली. 'ग्लोबल फाऊण्डेशन'च्या वतीने चालवण्यात येणारं हे सेण्टर 'ग्लोबल ग्रुप'च्या सीएसआर प्रकल्पाचा एक भाग आहे. हे सेण्टर सुरू करण्याची मूळ संकल्पना ग्लोबल ग्रुपचे माजी अध्यक्ष दादासाहेब तिरोडकर यांची होती. त्यासाठी मस्जिद बंदरच्या दरियास्थान स्ट्रीटवर एका छोटीशी जागाही विनामूल्य मिळाली. अंध विद्यार्थ्यांना कम्प्युटर प्रशिक्षण देणं हे काम तसं अवघड. पण ग्लोबल फाऊण्डेशनचे ट्रस्टी आणि एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी के.व्ही.शेषाद्री यांनी हे आव्हान स्वीकारलं. ग्रुप कॅप्टन म्हणून ते एअर फोर्समधून सेवानिवृत्त झाले आहेत. १९७१च्या लढाईत त्यांनी आसाम आणि बांगलादेशचा मोर्चा सांभाळला होता. त्यांना शौर्यचक्रही मिळालं आहे. शेषाद्री यांचा पिंडच सैनिकाचा असल्याने सेण्टरच्या प्रत्येक कामात शिस्त दिसते.

या सेंटरमध्ये एका वेळेला सहा विद्यार्थ्यांना ट्रेनिंग दिलं जातं. त्यासाठी जॉब ॲक्सेस विथ स्पीच (JAWS) नावाचं सॉफ्टवेअर वापरण्यात येतं. हे सॉफ्टवेअर खास अंधांसाठी बनवण्यात आलं आहे. त्यात की-बोर्डावर टाइप करण्यात येणारी अक्षरं स्क्रिनवर दिसतात आणि त्याचवेळी त्यांचा ध्वनीही ऐकू येतो. संस्थामध्ये तीन कोर्सेस चालवले जातात. बेसिक कम्प्युटर, ॲडव्हान्स्ड सॉफ्टवेअर प्रोग्राम आणि हार्डवेअर ट्रेनिंग प्रोग्राम. या कोर्सेचा कालावधी चार महिने ते एक वर्षापर्यंतचा आहे. बेसिक कोर्समध्ये कम्प्युटरशी संबंधित सर्व प्राथमिक गोष्टी शिकवल्या जातात. ॲडव्हान्स कोर्समध्ये जावा, सी, सी++ सारख्या लँग्वेजेस शिकवल्या जातात. हार्डवेअरच्या कोर्समध्ये हार्डवेअरसंबंधित ट्रेनिंग दिलं जातं. अंधांना हे कोर्स भारतात कुठेही शिकवले नाहीत. त्यांची फीसुद्धा नाममात्र आहे. आत्तापर्यंत २२० विद्यार्थ्यांनी बेसिक कोर्स तर १२० विद्यार्थ्यांनी ॲडव्हान्स्ड कोर्स पूर्ण केला आहे.

सेण्टरमधल्या विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक सॉफ्ट स्किल्सही शिकवली जातात. म्हणूनच इथले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात समर्थपणे काम करत आहेत. चारुदत्त जाधव हा 'टीसीएस'सारख्या सॉफ्टवेअर क्षेत्रातल्या आघाडीच्या कंपनीत काम करत आहे. त्याच्या हाताखाली ४०० इंजिनीअर्स आहेत. जूझर काँचवालासुद्धा 'इन्फोसिस'मध्ये नोकरी करून महिना ७० हजार रुपये कमावत आहे. खंडू भंडारी आणि शैलेश अंबेकर हे 'जीटीएल'मध्येच रिक्रुटमेण्ट मॅनेजर म्हणून रुजू झाले आहेत. परिमल भट ही विद्यार्थिनी एअर इंडियात हेल्थ को-ऑर्डिनेटर म्हणून कार्यरत आहे. राजश्री सानप ही नाशिकची विद्यार्थिनी. दर रविवारी ती नाशिकहून सेण्टरमध्ये यायची. सध्या ती स्टेट बँक ऑफ इंडियात मोठ्या पदावर आहे. सेण्टरमध्ये ट्रेनिंग घेऊन बड्या कंपन्यांमध्ये चांगल्या हुद्द्यावर काम करणारी अशी अनेक उदाहरणं देता येतील.

सेंटरची कोऑर्डिनेटर दीप्ती आमरे हीसुद्धा याच संस्थेमध्ये शिकलेली आहे. ती दहिसरहून मस्जिद बंदरला दररोज येते. मूळची सिंधुदुर्गची दीप्ती दादरच्या एका ब्लाईंड स्कूलमध्ये दहावीपर्यंत शिकली. पुढे तिने रुईया कॉलेजमधून ग्रॅज्युएशन तर मुंबई विद्यापीठातून बीएड केलं. त्यानंतर ती मुंबईतल्याच एका नामांकित शाळेत नोकरीसाठी गेली होती. अंध असूनही एवढं शिकली याबद्दल तिचं मुलाखतीत कौतुक करण्यात आलं पण नोकरी मात्र देण्यात आली नाही. निराश झालेल्या दीप्तीला कुणीतरी या सेण्टरची माहिती दिली. इथे येऊन तिने ॲडव्हान्स्ड कोर्स केला आणि सध्या ती सेण्टरमधल्या ट्रेनिंगची जबाबदारी एकटी सांभाळत आहे. या सेण्टरमध्ये विरार, वसई, पनवेल, बदलापूरहून विद्यार्थी येतात. अशाच प्रकारचं एक सेंटर अंधेरीतही सुरू करण्यात आलं आहे. त्या संस्थाची जबाबदारीही अंध असणारा राजू सिंग सांभाळत आहे.

संपर्क : मस्जिद बंदर-२३४५२५२५, अंधेरी-२६७०२५८३

◆ **राजेश वाघमारे**
mtartnedit@indiatimes.com

## ट्रेनिंग आयुष्यात उभं राहण्याचं

ग्लोबल ग्रुपमधले अनेक तज्ज्ञ सेंटरमधल्या विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स शिकवतात. त्यामुळे ग्रुपमधल्या सर्वांचंच सेण्टरशी एक वेगळं नातं आहे. चेन्नई आणि गुरगाव इथेही अशी सेण्टर्स आम्ही



लवकरच सुरू करत आहोत. दादर, कुर्ला, विरार, ठाणे, डोंबिवली, वाशी, पनवेल अशा विविध भागातही अशी सेण्टर्स काढण्याचा आमचा मानस आहे. पण त्यासाठी जागा आणि आर्थिक मदत मिळाली पाहिजे. तसं झालं तर त्या-त्या भागातल्या अंध विद्यार्थ्यांची सोय होईल. अंध विद्यार्थ्यांसाठी काही करू इच्छिणारे त्यांना सॉफ्ट स्किल्सही शिकवू शकतील. एवढंच नाही तर आजूबाजूला कुणी अंध विद्यार्थी असतील तर त्यांना आमच्या मस्जिद बंदर आणि अंधेरीच्या संस्थामध्ये पाठवू शकतील.

**- के.व्ही. शेषाद्री,**
ट्रस्टी आणि एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरी,
ग्लोबल फाऊण्डेशन